## भरधाव ट्रकच्या धडकेत बैल गंभीर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ९ एप्रिल :** पोवनी गावाकडून भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकने एका बैलाला जोरदार धडक दिली.या धडकेत बैल गंभीर जखमी झाला.त्यानंतर संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी राजुरा -गोवरी मार्गावरील वेकोलीची जड कोळसा वाहतूक दोन तास रोखून धरली.ही घटना गुरुवारी सकाळी ९.०० वाजताच्या सुमारास गोवरी गावाजवळ घडली. राजुरा तालुक्यातील गोवरी -पोवनी मार्गाने जाणाऱ्या भरधाव ट्रक क्रमांक (एम. एच.४०.सी. डी.४८११)ने गोवरी येथील शेतकरी अनिल बोबडे यांच्या मालकीच्या बैलाला जोरदार धडक दिली.या धडकेत एक बैल गंभीर जखमी झाला.तर दुसरा थोडक्यात बचावला. बैल गंभीर जखमी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.त्यानंतर संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी राजुरा गोवरी पोवनी मुख्य मार्गावरील वेकोलिची जड कोळसा वाहतूक रोखून धरली.

## रस्ता रुंदीकरणासाठी आंदोलन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ९ एप्रिल :** राजुरा, वरुर, विरुर, धानोरा चिंचोली अंतरगाव आणि राज्यसीमेपर्यंत मार्गाच्या दुरुस्तीसाठी व रुंदीकरणासाठी आज वरुर रोड येथे धरणे व चक्काजाम आंदोलन करण्यात आले यावेळी परिसरातील सर्व गावचे सरपंच मोठ्या संख्येमध्ये शेतकरी युवक वर्ग व महिला भगिनी उपस्थित झाल्या. याप्रसंगी अनेकांनी आपले मनोगत या ठिकाणी व्यक्त केले व निदर्शने केले सदर रस्ता अनेक वर्षापासून नादुरुस्त व कमी रुंदीचा असल्याने या ठिकाणी वारंवार अपघात होत असून या मार्गाने ग्रामीण रुग्णांना देखील अतिशय त्रास होत आहे यामुळे या भागातील लोकांची मानसिकता खराब होऊन आज या आंदोलनात जनता उतरली रस्त्यावर उतरून आंदोलन केले.

# पाण्याच्या टाकीवरुन खाली पडल्याने युवकाचा मृत्यू

### मिनझरी येथील घटना



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ एप्रिल :** तालुक्यांतील खडसंगी जवळील मूरपार येथील सुधाकर पेंदाम (वय ३८) गट ग्राम पंचायत मुरपार अंतर्गत असलेल्या मिनझरी येथील पाण्याच्या टाकीवरुन तोल गेल्याने खाली पडून मृत्यू झाल्याची घटना बुधवार ला दुपारी १-३० वाजताचे सुमारास घडली.

पोलीस सूत्राच्या माहितीनूसार आज दुपारी जवळपास १:३० च्या सुमारास मिनझरी येथील पाण्याची टाकी साफ करायला म्हणून ग्रामपंचायत तर्फे मुरपार गावातील युवक सुधाकर पेंदाम (वय ३८) व दुसरा सोबती एक असे दोघांना टाकीवर चढवले. टाकी साफ करून झाल्यावर पायऱ्यावरुन उतरताना सुधाकर पेंदाम याचा पाय घसरल्याने टाकी वरुन खाली पडल्यामुळे मृत्यू झाला.

मृतक सुधाकरचे पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,आई -वडील व बराच मोठा आप्त परिवार आहे, गावांत व परिसरात सर्वत्र हळहळ करीत आहेत. वृत्त लिहतस्तोवर चिमूर पोलिसांची कारवाई सूरु होती.

गावातील काही नागरीकाकडून असे सांगितले जातेय की, पाण्याच्या टाकी जवळ लागूनच मोहाचे झाड असून, या मोहाच्या झाडावर आग्या मोहार असल्याने शहद काढण्याच्या दृष्टीकोनातून चढले असून, त्या माश्या उडून चावत असल्यामुळे पाण्याच्या टाकीवरुन तोल जावून पडल्यामुळ मृत्यू झाला अशीही चर्चा नागरिकात सुरू होती.

# विधवा आईचे उपोषण, मुलाला शिपाई पदावर अनुकंपा नियुक्ती



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** मुनिम सिडाम शिपाई यांचे, २४ ऑगष्ट २०१७ ला निधनानंतर अनुकंपा तत्त्वावर, नवभारत कन्या विद्यालय येथील , रिक्त प्रयोगशाळा सहाय्यक पदावर मुलगा आकाश मुनिम सिडाम, शैक्षणिक पात्रता बी एस सी,याला,शासन निर्णय व उच्च न्यायालय यांचे निर्देशाप्रमाणे नियुक्ती देण्यासाठी २६ मार्च २०२५ सकाळी १० पासून नवभारत कन्या विद्यालय मुल समोर पत्नी हर्षकला सिडाम यांनी उपोषण सुरू केले होते, ७ एप्रिल २०२५ ला संस्था अध्यक्ष एड.अनिल वैरागडे यांनी शिपाई पदावर नियुक्ती आदेश देण्यात आला

हर्षकला सिडाम यांनी अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीबाबत विनंती अर्ज,दि.१२ एप्रिल २०२३, दि.२१ एप्रिल २०२३, दि.१० जुलै २०२३ व दिनांक २० मार्च २०२५ दिले यावर शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपूर दिनांक २७ जुन २०२३ ,दिनांक ६ जुलै २०२३ व दि. २५ मार्च २०२५ अनुकंपा नियुक्तीसाठी निर्देश दिले होते,

मा उच्च न्यायालय याचिका क्रमांक.५१२६/२०२३,निर्णय दिनांक २२ ऑक्टोंबर २०२४ अन्वये,उतारा क्रमांक चार मधे 'He also make stetment that he has no grievance against respondent no.4, (Akash Sidam),if he appointed on compassionate ground ' आकाश मुनिम सिडाम यांचे अनुकंपा नियुक्तीस याचिका करते यांनी कोणत्याच आक्षेप नाही असे स्पष्ट केले आहे परंतु संस्थेची धारना पक्की होत नव्हती शिक्षणाधिकारी राजेश पातळे यांनी संस्था अध्यक्ष एड.अनिल वैरागडे यांचेसोबत दुरध्वनीवर चर्चा केली,आ.सुधिर मनगट्टीवार,आ.संदीप जोशी यांनीही आकाश सिडाम याची अनुकंपा नियुक्ती करण्यात यावी असे स्पष्ट केले होते.

श्रीमती हर्षकला सिडाम यांनी मुलगा आकाश मुनिम सिडाम याला विज्ञान सहाय्यक पदावर अनुकंपा नियुक्ती देण्याची मागणी केली होती परंतु शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आली त्यामुळे २६ मार्च २०२५ सकाळी १० पासून नवभारत कन्या विद्यालय मुल समोर बेमुदत उपोषण आज ७ एप्रिल ला स्थगित करण्यात आले, आकाश सिडाम शिपाई पदावर आज रुजू झाले आहे. यावेळी खाजगी शाळा शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रमोद रेवतकर, रविंद्र जेनेकर, पुरुषोत्तम टोंगे, किशोर दहेकर,विजय खोब्रागडे,किरण खोब्रागडे, धनराज मुनघाटे, आशुतोष गाजेवार, श्रीमती जयश्री करकाडे, प्रविण सिडाम यांनी आभार व्यक्त केले आहे.

# दिल्लीत कारवाई मात्र चंद्रपुरात मुभा, चंद्रपूर जिल्ह्यात कोट्यवधीचा मद्य घोटाळा

## जनविकास सेनेकडून एसआयटीला १७७ पानांची तक्रार प्रथमदर्शनी सहा प्रकरणाचे लेखी पुरावे दिले

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** जिल्ह्यातील दारूबंदी हटवल्यानंतर नवीन दारू दुकान वाटप व जुन्या दारू दुकानांचे स्थलांतरण करताना अनेक प्रकरणात अनियमितता आढळल्याने शासनाने चौकशीसाठी एसआयटी ची स्थापना केली. जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष पप्पू देशमुख यांनी दिनांक ८ एप्रिल रोजी एसआयटी ला १७७ पानांची पुराव्यासह तक्रार केली.

जुन्या दारू दुकानाचे स्थलांतरण करताना किंवा नवीन दुकानाला मंजुरी देताना सदर इमारत किंवा गाळ्याचे बांधकाम अधिकृत असणे गरजेचे आहे. मंजुरी देण्यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षम अधिकाऱ्याने मौका चौकशी करून तसा अहवाल उत्पादन शुल्क विभागाला देणे गरजेचे असताना चंद्रपूर महानगरपालिका हद्दीतील एकाही दुकानासाठी अशा प्रकारचा अहवाल घेण्यात आला नाही. माजी नगरसेवक देशमुख यांच्या तक्रारीनंतर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी उत्पादन शुल्क विभागाला पत्र सुद्धा दिले होते. याच्या पुराव्याखातर नागपूर रोडवरील देशी दारू दुकान, दाताळा रोडवरील देशी दारू दुकान अशा काही दुकानांच्या मंजुरीच्या सर्व कागदपत्रांची प्रत जन विकास सेनेने एसआटी ला दिली.

जैन मंदिराच्या मागे असलेल्या केबी बियर शॉपी चे अंतर मंदिराच्या प्रवेशद्वारापासून केवळ ३० मीटरवर आहे. परंतु तालुका भूमी अभिलेख कार्यालयाने हे अंतर ५० मीटर असल्याचा अहवाल राज्य उत्पादन शुल्क विभागाला दिला. रघुवंशी कॉम्प्लेक्सच्या दोन्ही बाजूला लागून शाळा असताना या ठिकाणी पोलीस विभागाने चुकीचे अहवाल दिले.

दारू दुकानांचे वाटप व स्थलांतरण करताना १८ ते २० कोटी रुपयांचे देवाण-घेवाण झाल्याचा व यामध्ये महसूल विभाग, पोलीस विभाग तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी-कर्मचारी सामील असल्याचा लेखी आरोप देशमुख यांनी दिनांक ५ जुलै २०२२ रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे राज्याचे महासंचालक व चंद्रपूर जिल्ह्याचे उपअधीक्षक यांना दिलेल्या तक्रारीत केला होता. या तक्रारीच्या अनुषंगाने १० नोव्हेंबर २०२२ रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने देशमुख यांचे बयान नोंदवून पुराव्यासह संपूर्ण अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवला होता. याबाबत जनविकासनेने उत्पादन शुल्क विभागाचे तत्कालीन मंत्री शंभूराजे देसाई, प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर व आयुक्त विजय सूर्यवंशी यांना सुद्धा मार्च २०२३ मध्ये लेखी तक्रार केली होती. तक्रारीमध्ये नागपूर रोडवरील महालक्ष्मी टावर,दाताळा रोडवरील प्रवीण जुमडे यांच्या इमारतीमधील ,श्रीकृष्ण टॉकीज जवळील कॉम्प्लेक्स मध्ये तसेच नागवी येथील वैभव पिसे यांच्या घरी असलेले देशी दारू दुकान, जैन मंदिर ला लागून असलेली केबी बियर शॉपी, रघुवंशी कॉम्प्लेक्समधील परमिट रूम इत्यादी दारू दुकानांचा समावेश आहे.



### तक्रार करण्यासाठी तारखेची मर्यादा नाही

नागरिकांच्या प्रत्यक्ष तक्रारी स्वीकारण्यासाठी एसआयटी पथक ७ व ८ एप्रिल रोजी चंद्रपूरला आले होते. यावरून केवळ ७ व ८ एप्रिल ला तक्रारी स्वीकारण्यात येतील असा संभ्रम निर्माण झाला. पप्पू देशमुख यांनी याबाबत एसआयटी पथकाचे प्रमुख संदीप दिवाण यांच्याशी फोनवरून चर्चा केली. तेव्हा एसआयटी पथक गेल्यानंतरही चंद्रपूरच्या कार्यालयामार्फत नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यात येतील अशी माहिती एसआयटी प्रमुख दिवाण यांनी दिली. चुकीच्या ठिकाणी दारू दुकानांना मंजूरी दिली असल्यास नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने चंद्रपूरच्या कार्यालयामार्फत एसआयटी ला पुराव्यासह तक्रारी कराव्या असे आवाहन देशमुख यांनी पत्रकार परिषदेमध्ये केले.

# बुद्धगया येथील व्यवस्थापन बौद्ध समुदायाकडे सोपवावा

## विनोद खोब्रागडे यांची वरोरा न्यायालयात याचीका



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** बौद्धांच्या महाबोधी महाविहार बौध्द गयाचे व्यवस्थापन बौद्ध समुदायाकडे सोपवावे अशी मागणी करणारी याचिका सामाजिक कार्यकर्ते विनोद खोब्रागडे यांनी वरोरा न्यायालयात दाखल केली आहे. यावर सामाजिक कार्यकर्ते विनोद खोब्रागडे यांनी वरोरा न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे बिहारचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव, जिल्हाधिकारी, महंत आणि मुख्य पुजारी यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्याची मागणी केली असल्याचे पत्रपरीषदेत सांगीतले.

या संदर्भात विनोद खोब्रागडे म्हणाले की, भारतात हिंदू मंदिरे हिंदू व्यवस्थापनाद्वारे चालवली जातात, मुस्लिम मशिदी मुस्लिम व्यवस्थापनाद्वारे, चर्च ख्रिश्चन व्यवस्थापन, आणि जैन मंदिर जैन व्यवस्थापनाद्वारे चालवले जाते. त्याचप्रमाणे गया येथील बौद्ध महाबोधी महाविहार बौद्ध व्यवस्थापनाने का चालवू नये असा प्रश्न न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. या संदर्भात त्यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना निवेदन पाठवले आहे. परंतु ७ दिवस उलटूनही कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, बिहार सरकार आणि इतरांविरुद्ध वरोरा न्यायालयात फौजदारी याचिका दाखल करण्यात आली. त्यांनी सांगितले की, महाबोधी मंदिर कायदा बिहार सरकारने ६ जुलै १९४९ रोजी तयार केला होता. ज्यामध्ये ४ बौद्ध भिक्षू, ४ हिंदू आणि १ जिल्हाधिकारी अध्यक्ष जो स्वतः हिंदू आहे अशा प्रकारचा कायदा करण्यात आला. हा कायदा ७५ वर्षांपासून लागू आहे. भारतात २६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू झाले, परंतु आज ही महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात नाही. त्या ठिकाणी अतिक्रमण सुरू झाले आहे, तरीही व्यवस्थापन योग्य काम करत नाही. तसेच, तिथल्या अनुयायांना योग्य सुविधा पुरवल्या जात नाहीत. जगातील इतर बौद्ध राष्ट्रांकडून महाबोधी महाविहारासाठी गुप्त देणग्या येत असुन महाविहाराचा पाहिजे तसा विकास होत नाही. यासाठी बिहार सरकार आणि महाविहाराचे व्यवस्थापन जबाबदार असल्याचा आरोप खोब्रागडे यांनी पत्रकार परिषदेत केला.

# उन्हाळ्यातील पाणपोई नामशेष होण्याच्या मार्गावर

## नागरिकांकडून जारचाच होतोय वापर, उन्हाळयात थंड पाणपोई आठवणीतच राहणार



**सुधाकर दुधे**

**सावली, दि. ९ एप्रिल :** उन्हाळ्यात फेब्रुवारी महिन्यातच उन्हाची तीव्रतात वाढ होण्यास सुरुवात झाली बस स्थानक, चौका चौकात, ठिकठिकाणी थंड पाण्यासाठी सार्वजनिक पाणपोई पहावयास मिळत होते, पण आता ठिकठिकाणी पाणपोईची जागाही पाणी जारने घेतल्याने थंड पाण्याची पाणपोई हद्दपार झालेली पहावयास मिळत आहे.

उन्हाळ्यात तहानलेल्या तहान भागविण्यासाठी सामाजिक कार्यात सामाजिक संस्था दानशूर व्यक्ती लोकप्रतिनिधी स्वखर्चाने पाणपोई सुरू करत करतात, परंतु अलीकडच्या काळामध्ये पाण्याचा व्यापार सुरू झाल्याने पाणपोई जार व बॉटल बाटलीबंद पाण्यामुळे हद्दपार झाला आहे जार व बॉटल बंद पाण्याचा जमान्यात पाणपोई तुरळक प्रमाणात पहावयास मिळत आहेत. खंत व्यक्त केली जात आहे

तहानलेल्या पाण्याची सुविधा करणे ही आपली संस्कृती आहे त्यामुळे पूर्वीच्या काळात सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या संस्था संघटना सामाजिक सेवेचा भान जपत वाटसरूना प्यायचं पाणी उपलब्ध करून देण्यासाठी बसस्थानक, शासकीय कार्यालय विविध चौकात आठवडी बाजारात आदी ठिकाणी पाणपोई उभारली जाते त्यामुळे रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या कष्टकरी यांना माठातील थंड पाण्याची चांगली सोयी सुविधा उपलब्ध होत होती विशेषता उन्हाळ्यात यावर भर दिला जात असे कारण जेव्हा जारच्या प्लांट बाटलीबंद पाण्याचा व्यापार याचा फारसा विस्तार झाला नव्हता अलीकडे मात्र जारच्या पाण्यातून पाणी विकत सवलतीच्या दरात मिळू लागल्याने पाणपोई पद्धत मागे पडू लागली तर पाणपोई पाणी मिळणे किंवा पिणे आता कमीपणा वाटू लागलेला आहे एवढेच काय तो हॉटेलमध्ये बाटलीबंद पाणी विकत घेऊन पिण्याची संख्या जास्त वाढ झालेली पहावयास मिळत आहे परंतु ज्यांना बाटलीबंद पाणी विकत घेणे शक्य नाही अश्या सामान्य जनतेचे उन्हाळ्यात हाल होत आहेत त्यामुळे विविध मंडळी दानशूर व्यक्ती सामाजिक संघटना यांनी पुढाकार घेऊन पाणपोई पुन्हा सुरू करून तहणलेल्यानं पाणी उपलब्ध करून देण्याची काळाची गरज आहे.पूर्वीच्या काळी उन्हाळ्यात घराबाहेर पडल्यानंतर कुठे रांजण माठ त्यावर लाकडी झाकणी त्यावर लाल रंगाचा ओला कपडा झाकलेला पाणी पिण्यासाठी रंगीबेरंगी प्लास्टिक चे ग्लास अशी पाणपोई असायची त्यामध्ये नैसर्गिक पद्धतीने थंड झालेले पाणी ये -जा करणाऱ्यांची तहान भागवायची परंतु कालांतराने पाणपोई थंड पाण्याच्या जागा थंड पाणी जारने घेतली जारमुळे मातीच्या माठाचा वापर कमी प्रमाणात होण्यास सुरुवात झालेली आहे .

मुख्य चौक ,बसस्थानक परिसर ,शासकीय कार्यालय आदी ठिकाणी थंड पाणी म्हणून पाणपोई सर्वसामान्यांना आठवण नक्कीच उन्हाळयातील तिव्रतेमध्ये फिरत असताना अचानक तहान लागल्यानंतर पाणपोईचा शोध घेणे आता हद्दपार झाले आहे.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून महिलांचा सुप्त गुणांना वाव मिळतो : आ. देवराव भोंगळे



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ९ एप्रिल :** महिलांना चूल आणि मूल यापासून वेळ मिळत नसल्याने ते नेहमी आपल्या घरकामातच व्यस्त असते. त्यांच्यात असलेले सुप्त गुण हे कुठेदरी दडल्या जाते. आपल्या अंगी असलेल्या गुणाचे सादरीकरण करण्याकरिता मंच देखील उपलब्ध नसतो. परतू सांस्कृतिक महोत्सव असा कार्यक्रम आहे की महिलाना आपल्या कला, गुणाचे सादरीकरण करण्याची संधी मिळते. त्यामुळे महिलांनमध्ये असलेल्या सुप्त गुणांना या माध्यमातून वाव मिळतो. एवढेच नाही तर यातूनच काही जिल्हा स्तर, राज्य स्तरावर, नावलौकिक प्राप्त होते. यानिमित्ताने महिलांनी संस्कृतिक महोत्सवाचा फायदा घेत जास्तीत जात महिलांनी सहभागी होवून स्पर्धेत भाग घेतला पाहिजे. असे प्रतिपादन आमदार देवराव भोंगळे यांनी नांदा - बिबी येथे आयोजित आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार सांस्कृतिक महिला महोत्सवा प्रसंगी व्यक्त केले.

बिबी येथे आमदार देवराव भोंगळे यांचा संकल्पनेतून आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार सांस्कृतिक महिला महोत्सवाचे आयोजन केले होते. प्रमुख अतिथी म्हणून विवेक बोढे जिल्हा महामंत्री भाजपा, अर्चना भोंगळे, किरण बोढे, संजय मुसळे तालुका अध्यक्ष भाजपा, सतीश उपलेंचवार संघटन महामंत्री कोरपना, अपर्णा उपलेंचवार, उपस्थित होते.

पुढे ते बोलताना म्हणाले की, या पद्धतीचे कार्यक्रम आमचा द्वारे नेहमीच आयोजित केल्या जाते. या वर्षी प्रथमच परिसरात सांस्कृतिक महिला महोत्सवाचे आयोजन केले. तुमचा असाच उदंड प्रतिसाद लाभला तर आपण परिसरात दरवर्षी संस्कृतिक कार्यक्रम घेण्याचे आश्वस्त केले.

यावेळी आमदार देवराव भोंगळे व अर्चना भोंगळे तसेच विवेक बोढे व किरण बोढे यांचा नांदा - बिबी येथील भाजपा महिला मोर्चाचा वतीने सत्कार करण्यात आला.तब्बेतीचा कारणाने आमदार सुधीर मुनगंटीवार महिला सांस्कृतिक महोत्सवास उपस्थित राहू शकले नाही. मात्र त्यांनी फोन द्वारे महिलांना मार्गदर्शन करीत कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. महिला सांस्कृतिक महोत्सवात फॅन्सी ड्रेस, एकल नृत्य आणि समूह नृत्य स्पर्धेचे आयोजन केले होते. फॅन्सी ड्रेस स्पर्धेत प्रथम सुमनबाई कडूकर, द्वितीय पौर्णिमा आष्टेकर, तर तिसरा अश्विनी सोनवणे यांनी पटकावला. एकल नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक विना मोहितकर, द्वितीय क्रमांक कल्पना गेडाम, तिसरा क्रमांक निधी मडावी यांनी पटकावला. समूह नृत्य प्रथम क्रमांक एम जे गृप गडचांदूर, द्वितीय क्रमांक श्रीराम गृप बिबी, तिसरा क्रमांक भीम कन्या गृप बिबी यांनी पटकावला.

# वेकोली वणी क्षेत्र अंतर्गत जमीन अधिग्रहणाबाबत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर तत्परतेने मार्ग काढा : हंसराज अहीर

## स्थानिक युवकांसाठी ऑपरेटर ट्रेनिंग कार्यक्रम राबवून शासन निर्णयानुसार ८० टक्के रोजगार प्रदान करावा



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** वणी क्षेत्रीय महाप्रबंधक कार्यालय, उर्जाग्राम, ताडाली येथे दि. ८ एप्रिल रोजी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांचे द्वारे वणी क्षेत्राशी संबंधित जमीन अधिग्रहण, रोजगार, ओव्हर बर्डन कंपनीमध्ये स्थानिक युवकांना शासन निर्णयानुसार ८० टक्के रोजगार, एचपीसी वेजेस व कामगारांचे इतर प्रश्न, गाडेगाव ओसीएम परियोजनेतून सेक्शन ७ नंतर सुटलेली जमीन अधिग्रहण, निलजई परियोजनेतून सुटलेली उकणी येथील जमीन अधिग्रहण व पुनर्वसन, खाण परिसरातील कोळसा चोरी व वाढती गुन्हेगारी यावर मर्यादा आणण्यासाठी ड्रोन सेवेचा वापर, नविन प्रस्तावित परियोजनांची विद्यमान स्थिती, गावांचे पुनर्वसन, ५ वर्ष मर्यादेसाठी प्रलंबित नोकरी प्रस्ताव, न्यायालय प्रलंबित नोकरी प्रस्ताव या व अन्य विषयांवर बैठक पार पडली.

मुख्यमहाप्रबंधक वेकोलि, वणी क्षेत्र आभासचंद्र सिंग, क्षेत्रीय कार्मिक प्रबंधक बिनेज कुमार, सुजत कुमार पिशारेड्डी महाप्रबंधक संचालन, संजय जामगडे क्षेत्रीय नियोजन अधिकारी तसेच संजय तिवारी, मनोहर झाडे सरपंच गाडेगाव, शाम कनकम, यांचेसह गाडेगाव, विरूर, बोरगाव तसेच विविध परियोजनेतील प्रकल्पग्रस्तांची बैठकीत उपस्थिती होती.

निलजई प्रकल्पात उकणी येथील उर्वरित जमीन अधिग्रहणबाबत प्रस्ताव मुख्यालयाला पाठवण्यात आल्याची तसेच गावाच्या पुनर्वसनाच्या संदर्भात बेस लाईन सर्वे झालेला असल्याची माहिती प्रबंधनाद्वारे देण्यात आली.

तसेच गाडेगाव एक्सपॉन्शन ओसीएम प्रकल्पात सेक्शन ७ साठी गेलेल्या ६६५ हेक्टर जमिनीपैकी सोनुर्ली १० हेक्टर, विरूर ४० हेक्टर, जमीन सेक्शन ९ च्या वेळेस कमी करण्यात आल्याचा विषय या दरम्यान चर्चेला आला. आणि या उर्वरित जमिनीच्या अधिग्रहणाचा प्रस्ताव सदर बैठकीचा संदर्भ देवून वेकोलि मुख्यालयाला पाठविण्यात यावा असे निर्देश महोदयांनी दिले.

विरूर गावाच्या पुनर्वसन संदर्भात उर्वरित ६५ परिवारांना मुख्यतः प्लॉट देण्यात यावे किंवा याबद्दल्यात मिळणारा मोबदला वाढीव स्वरूपात देण्यात यावा याबाबत प्रस्ताव तयार करून वेकोलि मुख्यालयाला पाठविण्याचे निर्देश अहीरांनी दिले. तसेच वणी क्षेत्रामध्ये प्रस्तावित प्रकल्प ज्यामध्ये, कोलगांव परियोजना सेक्शन ११ साठी, गाडेगाव एक्सपॉन्शन ओसीएम परियोजना सेक्शन ९ साठी, मुंगोली नॉर्थ एक्सटेन्शन सेक्शन ४ साठी प्रस्तावित तर निलजई डिप हा प्रकल्प सुध्दा भविष्यात होणार असल्याची माहिती क्षेत्रीय महाप्रबंधक यांनी दिली.

विविध प्रकल्पातील अर्थहिन न्यायीक दाव्यांमुळे प्रलंबित असलेल्या नोकरी प्रस्तावांची छानणी करून सातबारा धारकांच्या बाजुने गुणवत्ता प्राप्त दाव्यातील रोजगार प्रस्ताव क्षतीपुर्ती बंधपत्र दाखल करून मंजूर करण्यासाठी वेकोलि मुख्यालयाला प्रेषित करावे असेही हंसराज अहीर म्हणाले.

# मूल तालुक्यात 'जिवंत सातबारा मोहिम'

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. ९ एप्रिल :** १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत दिनांक ०१ एप्रिल २०२५ पासुन "जिवंत सातबारा मोहिम" अंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांनी नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. या दृष्टीकोनातुन संपूर्ण राज्यात "जिवंत सातबारा मोहिम" राबविण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यांत आला आहे.

त्या अनुषंगाने मुल तालुक्यात सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये अद्ययावत करुन मयत खातेदारांच्या वारसाची नोंदीचे कामकाज पूर्ण करण्याच्या दृष्टीने "जिवंत सातबारा मोहिम" राबविण्यांत येत आहे. सातबारावरील मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया करणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व नोंदी घेवून सातबारा "जिवंत" म्हणजेच अद्ययावत करणेसाठी मोहिम राबविण्यांत येत असुन मोहिम राबविण्यासाठी खालील प्रमाणे कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यांत येत आहे. दि. १ एप्रिल ते ५ एप्रिल २०२५ ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी त्यांच्या साजा अंतर्गत येणाऱ्या गावामध्ये चावडी वाचन करुन न्यायप्रविष्ठ प्रकरणे सोडून गाव निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करणे. ६ एप्रिल ते २० एप्रिल वारसासंबंधी आवश्यक कागदपत्रे (मृत्युदाखला, वारसाबाबत सत्य प्रतिज्ञालेख /स्वयं घोषणापत्र, पोलीस पाटील / सरपंच /ग्रामसेवक यांचा दाखला, सर्व वारसांचे नावे, वय, पत्ते व दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक, रहिवास बाबतचा पुरावा ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे सादर करणे व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी स्थानिक चौकशी करुन मंडळ अधिकारी यांचे मार्फत वारस ठराव ई फेरफार प्रणालीमध्ये मंजूर करणे.

२१ एप्रिल ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी ई फेरफार प्रणालीमध्ये वारस फेरफार तयार करावा. त्यानंतर म.ज.म.अ. १९६६ च्या विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन मंडळ अधिकारी यांनी वारस फेरफार वर निर्णय घेवून त्यानुसार ७/१२ दुरूस्ती करावा जेणेकरुन सर्व जिवंत व्यक्ती ७/१२ वर नोंदविलेल्या असतील.

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे**

**निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खाली दिलेल्या कामासाठी ई-निविदा मागवित आहेत. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख: 09.05.2025 रोजी 12:00 वाजेपर्यंत.

**निविदा सुचना क्रमांक: Mech-MWP-QWA-NITR-NAB-25 कामाचे नाव:** ईतवारी स्थानकावर जलद पाण्याची व्यवस्था आणि नागभीड स्थानकावर सामान्य पाणी पुरवठा व्यवस्था पुरवणे, स्थापित करणे आणि कार्यान्वित करणे टर्न की आधारावर. **निविदा मूल्य:** रु. 4,12,69,482.77/- (चार कोटी बारा लाख एकोणसत्तर हजार चारशे ब्याऐंशी रुपये आणि सत्त्याहत्तर पैसे फक्त) **ईएमडी:** रु. 3,56,400.00/- **करार कालावधी:** 10 महिने **निविदा फॉर्मचा खर्च:** शून्य निविदा दस्तऐवज **IREPS** वेबसाइटवर **(www.ireps.gov.in)** 07.04.2025 पासून उपलब्ध होतील. **ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 09.05.2025 रोजी 12:00 वाजेपर्यंत

निविदा फक्त **IREPS** पोर्टलवरच स्वीकारली जाईल.

मॅन्युअल ऑफर्सला परवानगी नाही व प्राप्त झालेल्या अशा कुठल्याही ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत.

**वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता**

**द.पू.म. रेल्वे नागपूर**

AAA/02/08

**स्वच्छ भारत अभियान**

एक कदम स्वच्छता की ओर

## दगड मारुन बसची काच फोडली

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ एप्रिल :** चिमूर आगाराची बस कान्पा - जांभुळघाट - चिमूर कडे विद्यार्थी घेऊन जात असतांना जांभुळघाट बस थांब्यावर परिसरातील शेकडो विद्यार्थी चिमूरला शाळा - महाविद्यालयात जाण्यासाठी वाट पाहत असतांना बस चालकाने जांभुळघाट बस थांब्यावर विनंती करून सुद्धा बस थांबवली नाही. परिक्षा सुरू असतांना बस थांबवली नाही त्यामुळे विद्यार्थी हैरान झालेले होते. त्यामुळे अज्ञात इसमाने बसला दगड मारून काच फोडल्याची घटना घडली. या संबंधित बस चालकाने भिसी पोलीसात अज्ञात इसमाविरूद्ध तक्रार दिलेली आहे. जांभुळघाट , कपर्ला, बोरगांव, आंबेनेरी, कोट गांव, बोडदा, हेटी, परिसरातील शेकडो विद्यार्थी जांभुळघाट बस थांब्यावर असतात.

## 'आपले सरकार' पोर्टलचे कामकाज पाच दिवस बंद

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** राज्य शासनाच्या विविध विभागांच्या सेवा 'आपले सरकार' पोर्टलवरून प्रदान केल्या जातात. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांनी हे पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलची नियमित देखभाल आणि तांत्रिक अद्यतनासाठी दिनांक १० एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ असे पाच दिवस या पोर्टलची सेवा बंद राहील. या काळात कार्यालयीन कामकाजाचा फक्त एक दिवस वगळता उर्वरित सर्व दिवस सार्वजनिक सुट्टीचे आहेत. राज्यातील सर्वसामान्य नागरिक, ग्रामीण आणि शहरी भागातील 'आपले सरकार' केंद्र चालक, 'सेतू' केंद्र चालक, संबंधित ग्रामपंचायती आणि शासकीय कर्मचारी यांनी या पूर्वसूचनेची नोंद घ्यावी.

# शाश्वत आदिवासी विकासासाठी डिजिटल उपक्रम दिशादर्शक ठरणार: मंत्री डॉ. अशोक उईके

### प्रकल्प अधिकाऱ्यांची राज्यस्तरीय कार्यशाळा, नाविन्यपूर्ण पोर्टलचे उद्घाटन



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** आदिवासी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विभागाने विविध नाविन्यपूर्ण पोर्टल सुरू केले आहे. या डिजिटल पुढाकारामुळे भविष्यातील सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आदिवासी विकास विभागाने टाकले असून हा उपक्रम नक्कीच दिशादर्शक ठरेल, असा विश्वास राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी व्यक्त केला.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित प्रकल्प अधिका-यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंत्री डॉ. उईके यांच्या हस्ते विविध नाविन्यपूर्ण पोर्टलचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला विभागाचे सचिव विजय वाघमारे, आयुक्त लीना बनसोड, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त समीर कुर्तकोटी, अप्पर आयुक्त गोपीचंद कदम उपस्थित होते.

मंत्री डॉ. उईके म्हणाले, आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी अधिकाऱ्यांनी व्यापक कृती आराखडा तयार करावा. हा आराखडा म्हणजे फक्त योजना नव्हे, तर आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासासाठीचा एक दृढ संकल्प असला पाहिजे. राज्यातील प्रत्येक आदिवासी कुटुंबाच्या उन्नतीसाठी विभाग कटिबद्ध आहे. विभागामार्फत विविध योजनांसाठी इतर विभागांना दिल्या जाणाऱ्या निधीच्या वापराबाबत अनियमितता यासंबंधी विभागाने धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे.

**विद्यार्थी हा विकासाचा केंद्रबिंदू :** राज्यातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या जेवण व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता आणि गुणवत्तेचा दर्जा सुनिश्चित करण्यासाठी सेंट्रलाइज्ड डॅशबोर्ड प्रणाली कार्यान्वित करावी. समाजातील शेवटच्या घटकातील विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवणे, ही आदिवासी विकास विभागाची प्राथमिक जबाबदारी आहे. विद्यार्थी हा विकासाचा केंद्रबिंदू असून, त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. त्यामुळे विभागामार्फत विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवण्यासाठी प्रभावी नियोजन आणि प्रयोजनशील उपाययोजना कराव्यात.

**प्रकल्प अधिका-यांनी वसतीगृहांना भेट द्यावी :** आदिवासी समाजाच्या विकासासाठी संवाद होणे आवश्यक आहे. त्यासाठी पालक मेळाव्यांचे आयोजन करावे. सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांनी आदर्श आश्रम शाळेसाठी नियोजन करावे. वसतिगृहामध्ये सल्लागार समिती गठीत करून प्रकल्प अधिकाऱ्यांनी दर महिन्याला वसतिगृहांना भेट द्यावी. तसेच तेथील सोयी सुविधांची पाहणी करावी. असेही मंत्री डॉ. उईके यांनी यावेळी सांगितले.

### पोर्टल विषयी थोडक्यात माहिती

**शबरी नॅचरल्स इ कॉमर्स पोर्टल :** आदिवासी बांधवांची प्रिमियम उत्पादने ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध होणार आहे. **न्यूकलियस बजेट :** आदिवासी बांधवांना प्रकल्प अधिकारी स्तरावरून अनुदान देण्यासाठी. **पोर्टल कॉल आऊट सुविधा :** लाभार्थ्यांना लाभ मिळाला की नाही, त्यांना काय अडचणी आल्या याबाबत आता कॉल आउट सुविधा सुरू करण्यात आली आहे. **सन्मान पोर्टल :** सहकार्य, न्याय, मार्गदर्शन आणि निवारण असे हे पोर्टल आदिवासी विभागातील कर्मचाऱ्यांच्या तक्रार निवारण प्रणाली आहे. **एईबीएएस पोर्टल :** आधारच्या माध्यमातून सर्व कर्मचारी अधिकारी यांची दैनंदिन हजेरी फेस आयडी नुसार घेतली जाणार आहे. **ई- निरीक्षक ॲप्लिकेशन :** शाळांची मॉनिटरिंग करून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी वापरण्यात येणारी प्रणाली **टास्क मॅनेजर :** अधिकारी कर्मचारी यांची नियमित दैनंदिन कामे ऑनलाईन पोर्टल वर नियंत्रित करणे

# कोळसा पुनर्वसीत गावाला महसुली दर्जा

### अंतिम अधिसुचना शासकीय राजपत्रात प्रसिध्द

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) याच्या कलम ४ पोटकलम (१) च्या परंतुकाखाली राज्य शासनाने दिलेल्या अधिकारानुसार जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी मुल तालुक्यातील नवीन कोळसा हे गाव महसुली गाव म्हणून घोषित केले आहे. याबाबत अंतिम अधिसुचना शासकीय राजपत्रात ९ एप्रिल २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

मौजा नवीन कोळसा पुनर्वसीत गावाला महसुली दर्जा देण्याबाबत १९ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिका-यांमार्फत प्रारुप अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली होती.

याबाबत कोणाच्या हरकती व सुचना असेल तर त्या ४ एप्रिल २०२५ पर्यंत सादर कराव्यात, असे प्रारुप अधिसुचनेत नमुद होते. त्यानुसार आज ९ एप्रिल २०२५ रोजी कोळसा पुनर्वसीत गावाला महसुली दर्जा घोषित करण्यात आला आहे.

मुल तालुक्यात १ गाव वाढल्यामुळे मूल तालुक्यातील गावांची संख्या ११३ झाली असून चंद्रपूर तालुक्यातून १ गाव कमी झाल्यामुळे चंद्रपूर तालुक्यात आता १०१ गावे आहेत.

# कर्जमाफीबाबत सरकारने विश्वासघात केल्याने वाढणार शेतकरी आत्महत्येचे प्रमाण

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ९ एप्रिल :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत भाजपा आणि महायुतीने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मतांचा जोगवा मागताना, आम्ही सत्तेत आलो तर शेतकऱ्यांची कर्जमाफी करू, असे जाहीर आश्वासन जाहीरनाम्याद्वारे दिले होते. तसेच वेगवेगळ्या जाहीर सभांमधूनही प्रमुख नेत्यांनी जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्ष १० मार्चला अर्थसंकल्पातून काहीच न मिळाल्याने महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात केला. शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्ष १४ एप्रिल रोजी महायुतीच्या जाहीरनाम्याची गावा गावात होळी करणार आहे.

१० मार्चला २०२५-२६ चा अर्थसंकल्प माडताना राज्याचे अर्थ व नियोजन मंत्री अजित पवार यांनी जाहीरपणे वक्तव्य करताना आजच्या राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे शक्य नाही. तसेच बँकांना आदेश दिले की, तत्काळ कर्जाची वसुली करावी. शेतकऱ्यांनी ३१ मार्चपर्यंत कर्जाची परतफेड करावी. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अर्थमंत्र्यांचे विधान हिच महायुती सरकारची भूमिका असल्याचे मान्य केले. खुद्द वरिष्ठ मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही

जाहीरपणे सांगताना कर्जमुक्तीचे आश्वासन आमच्या जाहीरनाम्यात दिले होते. पण राज्य सरकारच्या वतीने अर्थसंकल्पात कर्जमाफीची घोषणा न करून शेतकऱ्यांचा विश्वासघात केला आहे. आज राज्यात कापूस, सोयाबीन, तूर व चणा यांचे भाव आधारभूत किमतीच्या (एमएसपी) च्या खाली आले आहे. केंद्र व राज्याच्या धोरणाप्रमाणे आधारभूत किमतीच्या खाली शेतमालाचे भाव आल्यानंतर ढवळाढवळीच्या योजनेखाली नाफेड, सीसीआय वा पणन महासंघ यांच्यामार्फत खरेदी करणे धोरणात्मकदृष्ट्या बंधनकारक आहे. परंतु आज सीसीआय किंवा नाफेडकडे संपूर्ण शेतमाल खरेदी करण्याची क्षमता व यंत्रणा नाही. अशा परिस्थितीत बाजारात शेतकऱ्यांना कवडीमोल भावात शेतमाल विकावा लागत आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे लागवडीचा खर्च भरून निघेल एवढेही रास्त भाव मिळत नाहीत. तर दुसरीकडे महायुती शासनाने पुन्हा जगाच्या पोशिंद्याचा घात केला. तसेच विदर्भात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी आहेत. पूर्व उत्तरा नक्षत्राचा पाऊस पडला नाही. दुष्काळ झाला, पिके करपली व सक्तीने जप्तीच्या वसुलीचे बँकेचे नोटीस आले की, शेतकरी जग लाजेस्तव समाजात, सोयरेधायऱ्यात लाज जाईल, या भीतीपोटी आत्महत्या करून मरत आहेत; पण त्याचे शासनाला देणेघेणे नाही. वीस वर्षांत जवळपास ४७ हजार शेतकऱ्यांनी कर्जापायी आत्महत्या केल्यात. आत्महत्यांचे सत्र विदर्भात सातत्याने सुरू आहे. त्यामुळे सरकारच्या या भूमिकेचा निषेध नोंदविण्यासाठी शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षातर्फे १४ एप्रिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी महायुतीच्या जाहीरनाम्याची होळी करण्यात येणार आहे. शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्ष शेतकऱ्यांवर होणारा अन्याय सहन करणार नाही, नव्या जोमाने कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून गावा गावात आंदोलन करावे, असे आव्हान शेतकरी संघटनेची जिल्हाध्यक्ष राजेंद्र झोटींग, राज्यकार्यकारणी सदस्य, विजय निवल, मिलिंद दामले तत्रज्ञान आघाडी प्रदेशाध्यक्ष, देवराजी धांडे स्वतंत्र भारत पक्ष, जयंतराव बापट माजी जिल्हाध्यक्ष, दिपकअन्ना आनदवार, देवेंद्र राऊत, भास्करराव महाजन, इंदरचद बैद, चंद्रशेखर देशमुख, अविनाश पोळकट, दशरथ पाटील अक्षय महाजन, गोपाल भोयर, गजानन ठाकरे यांनी केले

# राष्ट्रसंतांचे वाङ्:मयच मानव धर्माला तारु शकते : प्रा. राम राऊत

### भिसी येथे ग्राम जयंती उत्साहात साजरा



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ एप्रिल :** श्रीगुरूदेव सेवा मंडळ भिसी च्या वतीने वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती निमित्ताने ग्राम जयंती उत्सव आणि अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ गुरूकुंज आश्रम मोझरी अंतर्गत चिमूर तालुका श्री गुरूदेव सेवा मंडळ ग्राम जयंती प्रचार व प्रबोधन यात्रा स्वागत निमित्ताने मंगळवार ला विठ्ठल रूख्माई देवस्थान भिसी येथे आयोजित कार्यक्रमात प्रा. राम राऊत मार्गदर्शन करतांना म्हणाले की राष्ट्रसंताचे वाङ्:मयच मानव धर्माला तारू शकते.

यावेळी गजानन ठाकरे, महादेवराव पिसे, नत्थुजी भोयर, विठ्ठलराव सावरकर, बाबाराव दोहतरे, मोरेश्वर झाडे यांची उपस्थित होती. सामुदायिक प्रार्थना या विषयावर विचार व्यक्त करतांना गजानन ठाकरे म्हणाले की, प्रार्थनेकरीता एकत्रित आल्याने विश्वशांतीच्या प्रार्थनेबरोबरच सामाजिक ऐक्याची भावना आपोआप निर्माण होते, त्यामुळे आपल्या हातुन निरंतर राष्ट्रकार्य घडत असते. याप्रसंगी प्रा. महादेवराव पिसे यांचे सुद्धा मार्गदर्शन झाले.

ग्राम जयंती निमित्त सकाळी ग्राम स्वच्छता, ध्यान, पालखी सोहळा व भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम प्रसंगी गुरुदेव परीवारा सोबतच माजी राज्यमंत्री डॉ रमेशकुमार गजबे , माजी जिल्हा परिषद सदस्य ममता डुकरे, माजी पंचायत समिती सदस्य प्रदीप कामडी, गरीबा निमजे, समवेत गावातील अनेक प्रतिष्ठीत नागरिक सहभागी झाले होते.

या प्रसंगी प्रास्ताविक प्रचारक प्रा अनिल पंधरे यांनी केले, सुत्रसंचलन अधिसभा सदस्य विजयकुमार घरत यांनी तर उपस्थितांचे आभार सर्वाधिकारी वसंता घानोडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दयाराम कामडी, रतन शिवरकर, सुखदेव मुंगले, बाबा रेवतकर, माया घवघवे, सुरेखा कामडी, निळकंठ काटेखाये, हरीश्चंद्र नागपूरे, कृष्णा तेजने यांनी परिश्रम घेतले.

# घुग्घुस शहरात अनेक दिवसांपासून पाणीटंचाई



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ९ एप्रिल :** घुग्घुस शहरातील अनेक वार्डात पाणीटंचाई पाहता नागरिक कमालीचे अस्वस्थ झाले आहेत. कारण गेल्या काही दिवसांपासून शहरातील प्रमुख प्रभागात पाण्याची समस्या आहे. महिला, वृद्ध, लहान मुले पाण्यासाठी वणवण भटकत आहेत मात्र आजतागायत संबंधित विभागाने पाण्याचा प्रश्न सोडवला नाही का!

शहरात पाणीटंचाई होण्याचे अनेक कारणं आहेत, जसे की वाढती लोकसंख्या, कमी पाऊस, आणि पाण्याचा गैरवापर. या समस्येवर उपाय म्हणून पाण्याचा योग्य वापर करणे, पाण्याचा पुनर्वापर करणे, आणि पाण्याचे साठवण व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

तलाव, बंधारे आणि जलसाठवण तलावांची निर्मिती करणे आवश्यक आहे. पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे.

शहरात राजकारण शिगेला पोहोचले आहे. त्यांची नौटंकी शहरात चांगलीच गाजत असून, त्यामुळे आता नागरिक त्रस्त झाले आहेत. घुग्घुस येथील बरेच वार्डात प्रभागात गेल्या बरेच दिवसांपासून पाणीटंचाई आहे. घरांमध्ये पाणीटंचाई का, बोअरिंग, विहिरीकडे नागरिकांची धावपळ सुरू आहे. दिवसेंदिवस तपनओस पडत आहे, आणि मुख्य पाणी जीवनस्तर असल्यास पाणीटंचाई भागविण्यासाठी परिसरात टँकरद्वारे पुरेशा प्रमाणात नळ पुरवठा करावा, अशी मागणी नागरिकात वारंवार करीत आहे.

# डॉ. खत्री महाविद्यालयात अतिथि व्याख्यान



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे ९ एप्रिल रोजी हिन्दी विभाग तर्फे अतिथी व्याख्यान संपन्न झाले.

व्याख्यानाकरीता प्रमुख अतिथी प्रा. नयना थोरात, एफ.ई.एस. गर्ल्स महाविद्यालय हिन्दी विभाग प्रमुख उपस्थित होत्या. त्यांनी हिन्दी भाषा का साहित्यिक, व्यवहारिक महत्व एवं उपयोगिता (मिडिया लेखन) ह्या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी हिन्दी भाषा आज रोजगार, ज्ञान संवर्धन व मानव विकास करीता कशी महतवाची आहे हे मिडिया लेखनचे माध्यमातून समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष हिन्दी विभाग प्रमुख यांनी हिन्दी भाषा समजन्यास, व्यवहारात आनन्यास रोजगार व ज्ञान-संवर्धनाचे उपयोगात नक्कीच येते असे स्पष्ट केले. प्रास्ताविक तथा संचालन डॉ. पाटील सर यांनीच केले. आभार सेजल वर्भे या विद्यार्थीनीने मानले. अतिथी व्याख्यानास २९ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रा. नयना थोरात यांनी दिलीत. पूढील वर्षी सुध्दा आपन मार्गदर्शन करण्यास यावे ही विनंती विद्यार्थ्यांनी केली.

# मित्र परिवारच्या वतीने पडोली येथे अम्मा की पाणपोई




**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** स्व. गंगुबाई (अम्मा) जोरगेवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ आमदार किशोर जोरगेवार मित्र परिवारच्या वतीने पडोली येथे नागरिकांसाठी अम्मा की पाणपोई या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या पाणपोईचे उद्घाटन पडोली येथील प्रसिद्ध जनरल फिजिशियन डॉ. कश्यप यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच प्रवीण सिंग, सामाजिक कार्यकर्ते दयानंद नागरकर, नकुल वासमवार, गणेश पाचभाई, सावन महल्ले, शुभम बोन्द्रे, गणेश महल्ले, शुभम सोनवणे आदी उपस्थित होते. गावातील नागरिकांसाठी उन्हाळ्यातील तापदायक परिस्थितीत शुद्ध आणि थंड पाण्याची सोय होणे ही गरजेचे आहे. अम्मा की पाणपोईमुळे आता नागरिकांना दिलासा मिळणार आहे. अम्मा यांच्या सेवाभावी कार्याची आठवण करून देणारा हा उपक्रम असून भविष्यातही असेच उपक्रम राबविणार असल्याचे यावेळी मित्र परिवारच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# भाविकांसाठी बिस्कीट व पाणीचे वितरण

### माता महाकाली जत्रेत भाजपाचे मदत केंद्र, लोकनेते आ.सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** चंद्रपूरची आराध्य दैवत श्री माता महाकालीची जत्रा नुकतीच सुरू झाली आहे. चैत्र नवरात्रीच्या या पावन पर्वात दिवसेंदिवस जत्रेतील भाविकांची वाढणारी गर्दी वाढत आहे. याची दखल घेत महानगर भारतीय जनता पार्टी तर्फे मंदिर परिसरात भाविकांसाठी मदत केंद्र उभारण्यात या मदत केंद्रात भक्त करूनच्या येणाऱ्या समस्याच्या निराकरण होते तसेच मंदिर परिसरातील दुकानदारांना समस्या सोडवण्यासाठी व भक्त करून च्या एखादी नातेवाईक सदर जत्रे परिसरामध्ये हरवला असल्यास त्याची सुद्धा दखल भाजप मदत केंद्रामध्ये घेण्यात येत आहे. या सोबतच भाविकांना बिस्कीट व थंड पाणी




उपलब्ध करून देण्यात येत आहे. जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा माजी वने, मत्स्यपालन व्यवसाय व सांस्कृतिक कार्यमंत्री आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शन व पुढाकारातून हा उपक्रम महानगर भाजपा जिल्हाध्यक्ष राहुल पावडे यांच्या नेतृत्वात भाजप मदत केंद्रात मदत देण्यात येत आहे. यावेळी मदत करते संदीप आगलावे, अजय सरकार, रवी लोणकर, सचिन कोतपल्लीवार, दिनकर सोमलकर, राजेश यादव, राजेंद्र खांडेकर, विठ्ठल डुकरे, चंद्रकला, चंदन पाल, राजेंद्र दागमवार, आकाश ठोसे, बंडू गौरकार, आकाश मस्के, हेमंत बोमीटवार, रेखा दातारकर, (चेने) शालू ताई कनोजवार, सिंधुताई राजगुरू, कांताताई कोहपरे, मीनाताई पारमपल्लीवार, अर्चनाताई उरकुडे, संगीता बावणे, धुमदेव मरसकोल्हे, रवींद्र काळे, दशरथ, सोनकुसरे, रंजनाताई उमाटे, कुणाल गुंडावार, शाम दितारकर आदि उपस्थित होते.

### जत्रा संपेपर्यंत सुरू राहील केंद्र

चैत्र नवरात्रीमध्ये विशेषतः नांदेड व दक्षिण भारतीय भक्तांची मांदियाळी असते. रखरखत्या उन्हाची पर्वा न करता लोकं येतात. त्यांची सोय व्हावी म्हणून आम्ही सेवेत आहो. हे केंद्र जत्रा संपेपर्यंत सुरू राहणार आहे. भाविकांना बिस्कीट व थंड पाणी देखील देण्यात येत आहे.

## पालकमंत्री साधणार नागरिकांशी संवाद

### १२ एप्रिल रोजी चंद्रपूर जिल्हा दौरा

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके हे १२ एप्रिल रोजी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौ-यावर येत असून नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. १२ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता वन अकादमी येथे आगमन व राखीव.

दुपारी २ वाजता वन अकादमी येथे मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखड्याबाबत आढावा बैठक, दुपारी ३ वाजता इरई नदी संदर्भात बैठक, दुपारी ४ वाजता नियोजन भवन, पालकमंत्री यांच्या दालनात नागरिकांशी संवाद, सायंकाळी ६ वाजता महाकाली मंदीर येथे दर्शन व त्यानंतर सोयीनुसार यवतमाळकडे प्रयाण.

# अटल अर्थसहाय्य योजनेतर्गत मंजूर प्रकल्पांना तातडीने निधी वितरित करा : आ. किशोर जोरगेवार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत केली मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ एप्रिल :** चंद्रपूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांनी शासनाच्या अटल अर्थसहाय्य योजने अंतर्गत प्रकल्प उभारणीसाठी सादर केलेल्या मंजूर प्रस्तावांना चालू आर्थिक वर्षात तातडीने निधी वितरित करण्यात यावा, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई मंत्रालयात भेट घेऊन केली. यावेळी त्यांनी संबंधित मागणीचे निवेदनही मुख्यमंत्री फडणवीस यांना सादर केले. या भेटीप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे ग्रामीण तालुकाध्यक्ष नामदेव डाहुले, मनोज पाल आदीची उपस्थिती होती.



चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण १५ सहकारी संस्थांनी प्रत्येकी ५ लाख रुपये गुंतवणूक करून अटल अर्थसहाय्य योजनेअंतर्गत शेती उपयोगी प्रकल्पांसाठी सहकार विभागाकडे प्रस्ताव सादर केले आहेत. सर्व संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह त्रुटींची पूर्तता पूर्ण केली असूनही अद्याप निधी मिळालेला नाही.

विशेष म्हणजे, स्कॉर्पिओ, ट्रक यांसारख्या वाहनांसाठी निधी वितरित करण्यात आला आहे. मात्र अर्थमूव्हर्स सारख्या शेतीसाठी उपयुक्त वाहनांना या योजनेच्या लाभातून वगळण्यात आले आहे. अर्थमूव्हर्स वाहनांचा शेतीतील पाट काढणे, तळी साफ करणे, समांतर करणे, गाळ काढणे यांसारख्या अवजड कामांमध्ये उपयोग होतो. तरीही संबंधित अधिकाऱ्यांकडून या प्रस्तावांना अंतिम मंजुरी दिली गेलेली नाही.

या अन्यायामुळे सहकारी संस्थांवर ताण आला असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित हस्तक्षेप करून मंजूर प्रस्तावांवरील निधी वितरित करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना द्याव्यात, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी केली. यावेळी मतदार संघातील विविध विकासकामांवर सुद्धा चर्चा करण्यात आली असून प्रलंबित असलेले विकास कार्यांना मंजुरी देण्याची मागणी यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

